The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109

A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal

Vol 11.Issue 3; March 2024

# संत कबीरांच्या साहित्यातील पर्यावरण विचार

**डॉ.सुधीर गरड,**

श्री कुमारस्वामी महाविद्यालय, औसा, जि.लातूर

सर्वसाधारणपणे 'पर्यावरण म्हणजे आपल्या भोवतीचा परिसर'असे आपण म्हणतो यामध्ये आपल्या सभोवती असणारे प्राणी, पक्षी, वृक्ष, जमीन, पाणी, हवा, जंगल, डोंगर अशा अनेक नैसर्गिक घटकांचा समावेश होतो. हे सर्व घटक सुखदायी व आनंददायी मानवी जीवनासाठी आवश्यक आहेत.यांचे संतुलन बिघडले तर अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. आज आधुनिक माहिती तंत्रज्ञान युगात आपण अशाच समस्यांच्या विळख्यात सापडलो आहोत. या पर्यावरणाविषयी आधुनिक स्वार्थांध मानवाचे वर्तन विचित्र बनले आहे.त्यामुळेच केवळ मानवीजगत नव्हे; तर अखंड प्राणीजगत विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहे.

वेदकाळापासून अनेक ऋषीमुनींनी संतांनी पर्यावरणाविषयी जे चिंतन व्यक्त केले ते आजच्या काळातही महत्त्वाचे कसे आहे;याविषयी सांगताना पर्यावरणस्नेही साहित्य संमेलनात डॉ. रामचंद्र देखणे अध्यक्षीय भाषणात म्हणाले होते,"वेद,उपनिषदे,प्राचीन साहित्य आणि संत वाङ्मयातून व्यक्त झालेले पर्यावरण विषयीचे चिंतन आजच्या लोक जीवनालाही पर्यावरणाची वेगळी दृष्टी देऊन जाते. 'साहित्य' म्हणजे एकीकडे अंतर्मनाशी तर दुसरीकडे लोकमनाशी केलेला शब्दसंवाद आहे.हा संवाद मानवी पातळीवर सीमित न राहता माणूस निसर्गाशी बोलू लागतो तेव्हाच निसर्गसंवाद घडतो. परंतु सध्या वाढती लोकसंख्या, औद्योगीकरण, शहरीकरण, वाढते प्रदूषण, बदललेली जीवनशैली आणि निसर्गाला दुखावून काहीतरी मिळवण्याचा हव्यास यातून पर्यावरणाची गंभीर समस्या निर्माण झाली आहे."[1]

पर्यावरणाच्या अनुषंगाने मध्ययुगीन मराठी साहित्यातील संतांचा विचार केला तर; वारकरी संप्रदायाच्या संत ज्ञानेश्वरापासून यांनी तुकोबापर्यंत व समर्थ संप्रदायाच्या संत रामदास यांच्यापर्यंत पर्यावरणाचा विचार ठळकपणे व्यक्त केलेला दिसून येतो. याशिवाय आधुनिक कालखंडातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व गाडगेबाबा यांचाही उल्लेख आवर्जून करावा लागतो. याशिवाय मध्ययुगातील हिंदी भाषिक संतांचा विचार करता भक्तिकालीन कवीमध्ये गोस्वामी तुलसीदास, मीराबाई, सूरदास, गुरुनानक, रविदास यांनीही आपल्या साहित्यात निसर्गाचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला दिसून येतो. यातलेच एक उत्तर भारतीय क्रांतिकारी नाव म्हणजे 'संत कबीर'. तत्कालीन सामाजिक व धार्मिक व्यवस्थेवर तीव्र शब्दात प्रहार करणारे संत कबीर हे पर्यावरणाच्या बाबतीतही कसे जागरूक होते;ते त्यांच्या साहित्यातून व्यक्त झालेल्या पर्यावरण विचाराधारे या शोधनिबंधात मांडले आहे.

**उद्दिष्टे :-**

1. संत कबीर यांच्या जीवन आणि साहित्यविषयक कार्याची माहिती देणे.
2. संत कबीरांच्या साहित्यातील पर्यावरण विषयक विचारांची प्रासंगिकता अधोरेखित करणे.

**संत कबीर जीवन व कार्याविषयी :-**

संत कबीर यांच्या जन्म, मृत्यूकाल व स्थलाबाबत अनेक विवाद आहेत. विद्वान लेखक संशोधक यांच्या मतांमध्ये याबाबत खूपच तफावत असलेली दिसून येते. तरीही एकूण मतांचा विचार करता पंधराव्या शतकात कबीरांचा जन्म 'काशी'क्षेत्रात एका ब्राह्मण विधवेच्या पोटी झाला असावा. मुस्लिम समाजातील जुलाहा (विणकर) जातीतील निमा आणि निरू या दांपत्याने त्यांचे पालन पोषण केले.

कबीराचे शिक्षण आणि त्यांची गुरु-परंपरा याबाबत अनेक अनुमाने असून शेख तकी आणि रामानंद हे त्यांचे गुरु असल्याचे मत अनेक विद्वानांनी मांडले आहे. वैवाहिक जीवनाबाबत त्यांचा विवाह झाला होता का? एक झाले की दोन ?याविषयी मतभिन्नता असून अनेक आख्यायिकानुसार 'लोई' ही त्यांची पत्नी होती. वैराग्याकडे ओढा असल्यामुळे वैवाहिक जीवनात संत कबीर अधिक रमले नाहीत.'बुडती हे जन न देखवे डोळा ।म्हणूनिया कळवळा येत असे ॥[2] या तुकोबांच्या उक्तीप्रमाणे ते परमार्थाकडे म्हणजेच एका अर्थाने समाज उद्धाराकडे ओढले गेले.

**साहित्य विषयक कार्य :-**

संत कबीर शिक्षित नसल्यामुळे त्यांची साहित्यसंपदा त्यांचे शिष्य आणि भक्तांनी संपादित केलेली आहे. 'बीजक' हा ग्रंथ इसवी सन 1464 रोजी प्रथमतः प्रसिद्ध झाला. या ग्रंथालाच कबीर पंथीय लोक धर्मग्रंथ मानतात. यामध्ये रमैनी, सबद, साखिया यांचे भाग दिसून येतात. 'गुरु ग्रंथसाहेब' या ग्रंथामध्येही कबीरांच्या नावाने 228 पदे आणि 238 साखिया प्रसिद्ध आहेत. नागरी प्राचारिनी सभा काशीद्वारा डॉ. श्यामसुंदर दास यांनी संपादित केलेल्या कबीर ग्रंथावलीत रमैनी 07, पद 403, आणि साखिया 809 आधीचे संकलन केले गेले आहे. दोन हस्तलिखितांचा आधार घेऊन केलेले हे संकलन प्रामाणिक संकलन असल्याचे मत अनेक अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. कबीरांचे मोठेपण असे की, त्यांची पदे आणि दोहे त्यांनी स्वतःच्या अशा मिश्र भाषेत रचली. काही अभ्यासक त्यास 'सधुक्कडी' भाषा मानतात. यासंदर्भात डॉ.गोविंद त्रिगुणायत म्हणतात की, 'कबीर एकच एक भाषा वापरत नाहीत. त्यांच्या कबीर वाणीत हिंदी, उर्दू, फारसी तसेच भोजपुरी, पंजाबी, मारवाडी यांचे मिश्रण आढळते. यामुळेच कबीरांच्या भाषेला, 'खिचडी भाषा' असेही म्हणतात.'[3]

**कबीरांच्या साहित्यातील पर्यावरण**

कबीरांनी आपल्या साहित्यात पर्यावरणाचा विचार विविध स्वरूपात मांडला आहे. तो विविध मुद्द्यांच्या आधाराने आपण पाहणार आहोत.

**निसर्गाची परोपकारता :**

संत कबीरांनी पंधराव्या शतकाच्या दरम्यान दोहे आणि पदांच्या माध्यमातून समाज उपदेश केला या उपदेशात निसर्ग आणि माणूस यांचे नातेही त्यांनी स्पष्ट केले असून निसर्गापासून दूर जाऊन माणूस जीवन जगू शकत नाही तो पूर्णतः निसर्गावर अवलंबून असून माणसाने निसर्ग जपला पाहिजे व त्याचे रक्षण केले पाहिजे हा संदेश ते देतात. निसर्गाची परोपकारी दातृत्वाची वृत्ती मांडताना वृक्ष आणि नदी यांची उदाहरणे त्यांनी जाणीवपूर्वक दिली आहेत.

वृच्छ कबहु नहि भखै, नदी न संचै नीर।

## संत कबीरांच्या साहित्यातील पर्यावरण विचार

डॉ.सुधीर गरड,

परमारथ के कारने साधून धरा सरीर॥[4]

वृक्ष आपणास पाणी, फुले, सावली, फळे, जीवनासाठी आवश्यक असणारा ऑक्सिजन देतात. नदी आपल्या सभोवतालचे जीवन फुलवीत इतरांसाठीच वाहत असते. निसर्गातील विविध घटकांमध्ये असणारी दया, सर्वसमावेशकता, दातृत्व आणि परोपकारवृत्ती मनुष्याने स्वतःकडे घ्यावी असा सल्ला ते मानवाला आवर्जून देतात. 'काटनिये से नही बैर है, सिंचनिये से नही सर्वहरे। जो कोई वाको पत्थर मारे, वाह को फल दे रे ॥[5]

**कृतज्ञतेची भावना :**

प्रकृतीची प्रत्येक तत्वे, घटक मनुष्यासाठी वरदान असून या विविध घटकासाठी कबीर यांनी कृतज्ञतेची भावना व्यक्त केली आहे.सर्व जीवनाचे पालन पोषण करणारी धरती हा कबिरांच्या आस्थेचा विषय असून या धरतीची सहनशीलता आणि दातृत्वाचे मोठेपण पाहून कबीर धरती पुढे नतमस्तक होतात.

'सबकी उतपत्ती धरती, सब जीवन प्रतिपाल ।
धरती न जाने आप गुन, ऐसा गुरू विचार ॥'[6]

मानवी शरीर रचनाच मुळात धरती, जल, अग्नी, आकाश, पवन या पर्यावरणातील पाच तत्त्वापासून बनली आहे. या पाच तत्वांविषयी कृतज्ञतेची भावना मनामध्ये ठेवून आपण जीवन जगणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकासाच्या नावाखाली अंदाधुंद शहरीकरण वाढते आहे. प्रचंड प्रमाणात सगळीकडे वृक्षतोड चालू आहे वन्य प्राण्यांची संख्या मात्र उत्तरोत्तर कमी होत असून किरकोळ फायद्यासाठी मनुष्य आपल्याच पायावर कुऱ्हाड मारून घेत आहे या आधुनिक कालखंडाच्या बदललेल्या पार्श्वभू मीवर कबीरांच्या उपदेशाची प्रासंगिकता आपल्या लक्षात येते.

**सर्वव्यापी ईश्वर :**

ईश्वर हा केवळ दगडाच्या मूर्तीत नसून सृष्टीच्या कणाकणात वसलेला सर्वव्यापी असा आहे. वृक्षाची पाने, फुले तोडून देवाला वाहणाऱ्या माळिनीला उद्देशून संत कबीर समज देतात ते म्हणतात, पाती तोरे मालिनी, पाती पाती जीऊ।

'डाली छेडू न पत्ता छेडू, न कोई जीव सताऊ,
पात पात मे प्रभु बसत है, वाही को सिस नवाऊ॥'[7]

**रहस्यानुभूतीच्या अभिव्यक्तीत निसर्ग प्रतीकांचा वापर :**

संत कबीर यांनी आपल्या वाणीत प्रकृतीच्या विभिन्न तत्त्वांचा प्रयोग सतत केला आहे. दार्शनीक आणि आध्यात्मिक पदात जंगल, भूमी, जल, पर्वत, पवन, पशु-पक्षी, ग्रह-नक्षत्र, फुल-पत्र, वृष्टी या प्रतीकांचा वापर करून त्यांनी आपले अनुभव व्यक्त केले आहेत. रहस्य अनुभूतीची अभिव्यक्ती करण्यासाठी प्राकृतिक प्रतिकांचा वापर कबीर मोठ्या प्रमाणात करतात. जसे की हंस-जीव, मानसरोवर, अमृतकुंड किंवा गगनगर्जना इत्यादी,

मानसरोवर सुभर जल, हंसा केली कराहि ।
मुक्ताहल मुक्ता चुगै अब उडी अनंत न जाहि॥[8]

संत संगतीचे, सुसंगतीचे महत्त्व लोकांना पटवून देत असताना कबीरांनी पक्षांचे प्रतीक (बगळा, कावळा) वापरुन पांढरपेशा लोकांची पोलखोल केली आहे.

**संसाराची नश्वरता :**

कबीरांनी संसाराची नश्वरता म्हणजेच क्षणभंगुरता व्यक्त करत असताना निसर्गातील अनेक दृष्टांत दिले आहेत. मनुष्य जन्म हा दुर्लभ असून तो पुन्हा प्राप्त होत नाही. हे पटवून सांगत असताना ते म्हणतात; वृक्ष पाने तोडल्यानंतर ती पुन्हा जोडली जाऊ शकत नाहीत त्याप्रमाणे एकदा मृत्यू आला की नंतर शरीराची प्राप्ती होत नाही.

दुर्लभ मानुष जनम है,देह न बारंबार ।
तरवर ज्यों पता झडै, बहुरि न लगै डार॥[9]

पळसाचे फूल कांही दिवसांसाठी फुलते, पण नंतर ते सुकून गळून जाते. माणसाचे जीवनही तसेच असून त्याचा गर्व करणे निरर्थक असल्याचे प्रतिपादन करताना वास्तविक स्थिती विसरू नये असे कबीर सांगतात.

**जीवहत्या आणि मांसभक्षण विरोध :**

मनोरंजन, शिकार, पैसा कमावणे, जिभेचा स्वाद यामुळे वन्य पशुपक्षी यांच्याशी केले जाणारे हिंसात्मक वर्तन संत कबीरांनी धिक्कारले आहे.पर्यावरण चक्र संतुलित राहण्यासाठी सर्व जीव महत्त्वाचे असून आपमतलबी माणसाने प्राणीहत्या करून मांस, कातडी, शिंग यांचा व्यापार मांडला आहे.मानवी जीवनामध्ये दयाभाव हा महत्त्वाचा असून निर्दयी मानवाने प्राणीहत्या करू नये; जे प्राणीहत्या करतात त्यांच्या वाट्याला पाप येईल. मानवी जीवनाची सार्थकता प्रेम आणि परोपकारांमध्ये असून मनुष्य तर हानीरहित असणाऱ्या पशूंनाही मारून खातो. त्याविषयी ते खडा सवाल विचारतात.

बकरी पाती खाती है ताको काढी खाल।
जो नर बकरी खात है, तिनका कौन हवाल ॥[10]

निसर्गाशी एकरूप राहून सहज, साधेपणाने शाकाहारी जीवन जगण्याचा कबीर यांनी सल्ला दिलेला आजच्या कालखंडात तो खूपच महत्त्वपूर्ण आहे.

**सारांश :**

कबीरांच्या साहित्यामध्ये अशी अनेक पदे, दोहे सापडतील ज्यातून त्यांचा पर्यावरण विषयक विचार व्यक्त झाला आहे. मध्यकाळात दुष्काळजन्य परिस्थिती होती. या दुष्काळाचे चटके तत्कालीन समाज सहन करत होता; त्यामुळे कदाचित इतर, संत कबीराचे अधिकचे लक्ष पर्यावरणाकडे गेलेले असावे. अखंड प्राणीमात्राविषयीचा कळवळा आणि सहानुभूती मनात असल्यामुळे पर्यावरणाचा समतोल आणि त्याची देखभाल कबीरांना आवश्यक वाटते; म्हणूनच ते समाजाला आपल्या साहित्याच्या माध्यमातून संदेश देतात. यासंदर्भात हिंदी संत साहित्य अभ्यासक डॉ. बलदेव वंशी म्हणतात "धर्म के स्थान पर धार्मिकता, अध्यात्मिकता को बृहतर सामाजिक आचरण से जोडकर कबीर ने बहुत नैतिक संहित प्रस्तुत की है । 'यहाँ साँई के सब जीव है, किडी कुंजर दोय' की विचारणा देकर समूचे जीव

जगत् को एक सूत्र में बांध दिया है तथा जीव हत्या एव पर्यावरण विनाशी सभ्यता को छह सौ वर्ष पूर्वही चेता दिया है।"[11]

आज सगळीकडे 'निसर्ग वाचवा', 'पर्यावरण वाचवा', 'झाडे लावा झाडे वाचवा', अशा घोषणा ऐकू येत आहे. निसर्ग आणि पर्यावरणाकडे केलेल्या दुर्लक्षाची शिक्षा माणूस भोगतोच आहे. पर्यावरणाची समस्या अधिक गंभीर होण्याच्या अगोदर दूरदृष्टीच्या संत कबीरांनी दिलेला पर्यावरण विचार मनात रुजविण्याची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


1. डॉ. देखणे रामचंद्र, अध्यक्षीय भाषण, पाचवे पर्यावरणस्नेही साहित्य संमेलन, पुणे.
2. नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृष्ठ 130.
3. mr.m.wikisource.com.
4. उपाध्याय आयोध्यासिंह, कबीर वचनावली, जय भारती प्रकाशन, मुठ्ठीगंज, इलाहाबाद, पृष्ठ 117.
5. दास शामसुंदर, कबीर ग्रंथावली, विश्वभारती प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर पृ.78.
6. साध्वी ज्ञानानंदजी, सद्गुरु कबीर साहबकृत बीजक, विवेक प्रकाशन, झारखंड, पृ. 478.
7. उनि., दास शामसुंदर(संपा.), पृष्ठ 120.
8. उनि., दास श्यामसुंदर (संपा), पृष्ठ 72.
9. उनि., उपाध्याय अयोध्यासिंह, पृष्ठ 102.
10. शुक्ल रामचंद्र, हिंदी साहित्य का इतिहास, प्रयाग पुस्तक सदन, इलाहाबाद, पृष्ठ 46.
11. वंशी बलदेव (संपा), कबीर एक पुनर्मूल्यांकन, आधार प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, पंचकुला, हरियाणा, पृष्ठ 13.